माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ११५०/२०२२**

**अपिलार्थी, श्री. झनकलाल सहेसराम बिसेन**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
ग्राम पंचायत, बबई, पो. गिधाडी, ता. गोरेगांव जि. गोंदिया

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती, गोरेगांव ता. गोरेगांव जि. गोंदिया

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०७.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.१२.२०२१ | २८.१२.२०२१ | १०.०१.२०२२ | २८.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०१.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " ग्राम पंचायत, बबई येथे दैनंदिन पाणी पुरवठा व कर वसुली करणे व देखभाल करण्यासाठी नेमण्यात आलेल्या मजुरांचे ग्रा.प. द्वारे घेण्यात आलेल्या कलम ६१ नुसार ठराव, त्या संबंधाने नियुक्तीचे आदेश, मजुरांचे अनुभव प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्र त्या संबंधाने शासकीय आदेश व कलम ६१ संबंधीत नियमावली, मजुरीचा दर इत्यादी सर्व संबंधीत कागदपत्राची सत्यप्रत देण्यात यावी " याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला असुन, त्यांना एकुण २ पृष्ठांची माहिती पुरिवण्यात येत आहे, असे अपिलार्थीस सुचित केले. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १०.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " मागितलेली माहिती आजपर्यंत पुरविण्यात आलेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून, अपील अशंता मंजुर करण्यात येत असुन, जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत, बबई यांनी अपिलार्थीने मागणी केलेली व ग्राम पंचायत अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती १० दिवसाचे आत पुरविण्यात येवून तसा अनुपालन सादर करावा, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २७.०४.२०२२ रोजी** " जोडपत्र अ मध्ये मागितलेली माहिती अपूर्ण दिलेली आहे, माहिती

देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. तसेच कलम २० नुसार शास्ती व दंड करण्यात यावा " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०९.०७.२०२४ रोजी ऑनलाईन सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव श्रीमती सरीता लील्हारे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक २७.०४.२०२२ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जानंतर दिनांक ०१.१२.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ मधील माहिती म्हणजेच ग्राम पंचायत, बबई येथे रोजंदारीवर ठेवण्यात आलेल्या मजुरांविषयीची माहिती प्राप्त झाली असल्याचे सुचित केलेले असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढुन नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**द्वितीय अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०९.०७.२०२४**

जावक क्रमांक 6698 दिनांक 20 SEP 2024